
मनोगत । चंद्रकांत केळकर

# भूमिकेकरता आवश्यक असलेली दृष्टी समाजकार्यानेच दिली!

अर्थशास्त्राचे अध्यापन आणि अर्थव्यवस्थेच्या संदर्भात काही मूलभूत मांडणी करणारे लेखन करणाऱ्या चंद्रकांत केळकर यांचा अनेक सामाजिक संस्थांच्या उभारणीत मोलाचा सहभाग राहिला आहे. वैचारिक व रचनात्मक या दोनही प्रकारच्या कार्यासाठी आणि महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांचे संयोजन मुंबई येथील केशव गोरे स्मारक ट्रस्टकडे असताना त्याची यशस्वी कार्यवाही करून या पुरस्कारांना प्रतिष्ठा मिळवून दिल्याबद्दलची कृतज्ञता म्हणून हा विशेष कार्य पुरस्कार देण्यात येत आहे.



माझ्या विशेष कार्याकरता महाराष्ट्र फाऊंडेशनने देऊ केलेला पुरस्कार मी विनम्र भावनेने स्वीकारत आहे. समाजाकडून आलेला पैसा समाजाकडेच परत जावा असे मी मानतो; हे पुरस्काराच्या संदर्भात मी सांगू इच्छितो.

खरे पाहता महाराष्ट्र फाऊंडेशनने आजपर्यंत ज्या व्यक्तींना त्यांच्या परिवर्तनशील कामाबद्दल सन्मानीत केले त्याचा विचार करता मी केलेले काम काठावर उभे राहून केलेल्या कामासारखे आहे. फाऊंडेशनने सन्मानीत केलेल्या अनेकांनी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपले अवघे आयुष्य झुगारून दिले. त्यांच्या अशा कार्याचा विचार करता, माझे काम सुरुवातीची बाँबे पोर्ट ट्रस्टमधील नोकरी करून व त्यानंतर प्राध्यापकी करूनच मी करीत आलो आहे. निवृत्तीनंतरची माझी गेली २० वर्षे मात्र मला माझा पूर्णवेळ देऊन सामाजिक काम करता आले.

माझ्या लेखनाचा विचार करता, अर्थसंवाद किंवा पत्रिकेसारख्या वैचारिक नियतकालिकातील माझ्या सुरुवातीच्या लेखनाचे, किंवा अलीकडच्या माझ्या 'नाणेनिधी' व 'पर्यायी लोकवादी व्यवस्था' या पुस्तकांत मी घेतलेल्या भूमिकेकरता आवश्यक असलेली दृष्टी मला माझ्या समाजकार्यानेच दिली असे मी म्हणेन. विशेषत: महाराष्ट्र फाऊंडेशनच्या पुरस्कारासाठी व्यक्ती अथवा संस्था निश्चित करताना त्या त्या व्यक्तीच्या कामाचा जो परिचय होत गेला, त्यातून माझी वैचारिक दृष्टी अधिकाधिक स्पष्ट होत गेली. माझ्या मते, त्यामुळे मी माझ्या अलीकडच्या लेखनात समाज परिवर्तनाच्या नव्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. महाराष्ट्र फाऊंडेशनचे काम करताना मीही 'वाढलो'. हे मी सांगणे मला गरजेचे वाटते. हे काम करीत असताना आज आपल्यात नसलेला माधव साठे सध्या मुंबईच्या पाटकर महाविद्यालयात असलेला प्रा.रवी देवगडकर यांच्याशी होत गेलेल्या चर्चामधून हे होत गेले असे मला वाटते.

**माझ्या लेखनाचा विचार करता, अर्थसंवाद किंवा पत्रिकेसारख्या वैचारिक नियतकालिकातील माझ्या सुरुवातीच्या लेखनाचे, किंवा अलीकडच्या माझ्या 'नाणेनिधी' व 'पर्यायी लोकवादी व्यवस्था' या पुस्तकांत मी घेतलेल्या भूमिकेकरता आवश्यक असलेली दृष्टी मला माझ्या समाजकार्यानेच दिली असे मी म्हणेन. विशेषत: महाराष्ट्र फाऊंडेशनच्या पुरस्कारासाठी व्यक्ती अथवा संस्था निश्चित करताना त्या त्या व्यक्तीच्या कामाचा जो परिचय होत गेला, त्यातून माझी वैचारिक दृष्टी अधिकाधिक स्पष्ट होत गेली. माझ्या मते, त्यामुळे मी माझ्या अलीकडच्या लेखनात समाज परिवर्तनाच्या नव्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. महाराष्ट्र फाऊंडेशनचे काम करताना मीही 'वाढलो'.**

वैचारिकदृष्ट्या मी लोहियावादी आहे. शूमाकर यांच्या 'स्मॉल इज ब्युटिफुल'मधील विचार मी मानतो. एकोणिसशे सत्तरीमध्ये गालब्रेथ यांच्या 'इंडस्ट्रियल स्टेट' या ग्रंथाच्या निमित्ताने लिहिलेला किंवा 'क्लब ऑव्ह रोम'च्या 'लिमिटस् टु ग्रोथ' या अहवालावर भाष्य करणाऱ्या माझ्या लेखातून माझी लोहियांच्या विचारांशी असलेली बांधिलकी व्यक्त झालेली आहे. किंवा गेल्या मे महिन्यामध्ये प्रकाशित झालेले 'दुसरे जग शक्य आहे : पर्यायी लोकवादी व्यवस्था' या माझ्या पुस्तकामध्येही मी हीच वैचारिक दृष्टी ठेवली आहे.

भारतातील आजची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. नवीन आर्थिक धोरणानंतर भारतातील सामान्य जनता एक प्रकारे देशी वसाहतवादाला तोंड देत आहे. देशभर उभे राहणारे एस.सी.झेड, खाणी, अणुऊर्जा किंवा औष्णिक वीज प्रकल्प यांतून निर्माण होणारे मनुष्य वस्तीचे विस्थापन व पर्यावरणीय नाश यांच्या रूपाने हा देशी वसाहतवाद प्रकट होत आहे. परंतु त्या विरोधात उभे राहणारे लढे मात्र विखुरलेले, वेगवेगळ्या राहुट्यांमध्ये विभागले असल्याचे दृश्य दिसते. त्यामुळे एका बाजूला, शासनाची दंडशक्ती व धनदांडग्यांचे संपत्तीचे बळ, तर दुसऱ्या बाजूला विखुरल्यामुळे विरोधामधील जाणवणारा क्षीणपणा, असे सध्याच्या भारतातील सामान्य माणसाच्या लढ्याचे चित्र दिसते. दक्षिण अमेरिकेधील व्हेनिझुएला, मेक्सिको, अर्जेंटिना, ब्राझील यांसारख्या देशात लक्षावधी लोकांच्या उठावातून गेल्या १० वर्षांत झालेले राजकीय बदल पाहता भारतातील राजकीय आर्थिक लढ्यांमधील विखुरलेपण खूपच जाणवते. अशा प्रकारचे विखुरलेपण आपल्या देशात नसते तर नर्मदा बचाव आंदोलन किंवा दक्षिणेकडील केरळ, तामिळनाडूमध्ये होणारी जनआंदोलने परिणामांच्या दृष्टीने अधिक व्यापक व यशस्वी झाल्याचे चित्र दिसले असते, किंवा सध्याचे उदाहरण घ्यायचे तर जैतापूरच्या प्रकल्पाचा प्रश्न किमानपक्षी

संपूर्ण कोकणाचा झाला असता. कदाचित राजकारण व लोककारण यामध्ये आपल्या देशामध्ये झालेली फारकत हेही त्याचे कारण असावे.

माझ्यामते या विखुरलेपणाची तीन कारणे असावीत. एक– भारतीय समाजातील जातीव्यवस्थेमध्ये अशी एक अंगभूत शक्ती आहे की, जिच्यामुळे संघर्षाकरता आवश्यक असलेली एकजूट, सहोदरी जाणीव, निर्माणच होत नसावी; या शक्तीमुळे फुटून निघण्याची मानसिकता, अलगपणाची जाणीव अधिक प्रबळ होत असावी. दुसरे कारण– सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीकरता बांधलेल्या संघटनांमध्ये वापरली जाणारी श्रेणीबद्ध संरचना. ही श्रेणीबद्ध रचना साधारणपणे कार्यकर्त्यांच्या ज्येष्ठत्वाशी असते. तिसरे– 'ज्येष्ठांचे ऐकावे' या मंत्राचे भारतीयाला मिळणारे बाळकडू हे बाळकडू नवीन विचार निर्माण होऊ देत नाही; व तो झालाच तर त्याला हे बाळकडू मूर्त स्वरूप येऊ देत नाही. त्यामुळे सामाजिक कार्यासाठी उभ्या राहणाऱ्या संस्था/संघटना व्यक्तीकेंद्री बनत असाव्यात, असे मला वाटते.

थोडक्यात, ज्या प्रागतिक विचारांची मी माझ्यापुरती जपणूक करण्याचा प्रयत्न केला, त्या विचारांना भारतात आज बरे दिवस नाहीत. याचे कारण ज्या व्यक्तींनी राजकीय किंवा सामाजिक कामाचे पुढारपण केले त्यांनी आपले काम प्रवाही ठेवले नाही व त्यामुळे त्यांच्या कामाकरता उभ्या केलेल्या संस्था/संघटना हे त्यांचे मठ बनले. माझ्या मते प्रागतिक विचारांच्या सर्व छटांच्या संस्था/संघटनांविषयी हे खरे आहे. सहकारी ग्राहक संस्था, ग्रामीण विकास, ट्रेड युनियन, शिक्षण संस्था या क्षेत्रात मी काम करत असताना अशा मठांचे अस्तित्व माझ्या अनेक वेळा अनुभवाला आले आहे. माझ्या मनातील ही बोच जाहीरपणे व्यक्त केल्याशिवाय मला राहवत नाही. कारण मी व्यक्त करीत असलेल्या व्यथेचा डाव्या चळवळीच्या हिताशीच थेट संबंध आहे. असो.

धन्यवाद.

**चंद्रकांत केळकर**
बी१०४, राजेश पार्क व्ह्यू,
पाईपलाइन रोड,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई ४०००५५.
Ph. 022-26686318

ओळख । मधू पाटील

# सर्जक ऊर्मी असलेले बुद्धिमान व्यक्तिमत्त्व

बाह्यत: स्थिरशांत वृत्तीत फारशी दिसून न येणारी, पण अंतरंगात प्रचंड क्रियाशील ऊर्जा असलेले हे व्यक्तिमत्त्व. या उर्जेचे संबंधित भवतालात वितरण व्हावे, अशी अंतर्यामीची सर्जक ऊर्मी असलेले हे बुद्धिमान व्यक्तिमत्त्व.

अर्थशास्त्र विषयाचे महाविद्यालयीन अध्यापन आणि प्रशासन, सांस्कृतिक उपक्रमांचे मार्गदर्शन, वसतिगृह व्यवस्थापन, ग्रामीण विकास, वनीकरण-नवउद्योजक या संबंधित अभ्यासक्रम संकल्पनांसहितचे प्रशिक्षण, त्याचबरोबर पूर्वप्राथमिक-माध्यमिकपासून पदव्युत्तर संशोधन केंद्रापर्यंतचे संस्थापन/दृढीकरण अशा शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असतानाच, सामाजिक, सांस्कृतिक प्रकल्पांत सर्वस्वाने सहभागी होणारे आणि वैचारिक लेखनात लक्षवेधी भर घालणारे विचारवंत प्राध्यापक-प्राचार्य या नात्याने संबंधित क्षेत्रांतील जाणत्यांमध्ये ते सर्वज्ञात आहेत.

रत्नागिरी-रायगड येथील कष्टाच्या कोकण-मातीचा वारसा घेत आणि तेथील राष्ट्र सेवादलाचे संस्कार घेत मुंबईत आल्यानंतर पोर्ट ट्रस्टमध्ये नऊ वर्षे लेखनिकाची काबाडी करीत त्यांनी बी.कॉम. आणि एम.ए. (अर्थशास्त्र) असे विद्यासंपादन केले; आणि त्यानंतर लागलेच अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयात ३१ वर्षे अध्यापन केले. औरंगाबाद, अलिबाग, गोवे, पालघर अशा ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच मुंबईतील पाटकर, मिठीबाई महाविद्यालयातील नागरी विद्यार्थ्यांनाही त्यांनी गंभीर चिंतनशील अध्यापनाचे वस्तुपाठ दिले. शेवटची तीन वर्षे मिठीबाई महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्याने कार्यकुशल प्रशासन सांभाळत ते निवृत्त झाले.

शिक्षण क्षेत्रात खास रस असल्याने महाविद्यालयीन अध्यापन/प्रशासनात कार्यरत असतानाच त्यांनी नाईट हायस्कूल चिंचपोकळी (संस्थापक सभासद), गोरेगाव शिक्षण प्रसार मंडळ, गोरेगाव (२५ वर्षे कार्याध्यक्ष) आणि निवृत्तीनंतर ७ वर्षे सी.बी.पटेल रिसर्च सेंटर (संस्थापक आणि प्रमुख कारभारी) चा शिक्षण संस्थांमध्ये योगदान दिले. सध्या सोनोपंत दांडेतर शिक्षण मंडळी पालघर आणि संस्कारधाम केळवणी मंडळ-गोरेगाव या महाविद्यालयीन शिक्षणसंस्थांचे सल्लागार म्हणून ते कार्यरत आहेत.

गोरेगाव येथील अभिनव शिक्षण मंडळाच्या नंदादीप या माध्यमिक पर्यंतच्या विद्यालयाला मासिक साडेतीन लाख रुपये इमारतभाडे मिळेल अशा योजनाबद्ध शालागृहांच्या बांधणीतून त्यांनी संस्थेला आर्थिक स्थैर्य मिळवून दिले. विशेषत: झोपडपट्टीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेचा पायाभूत अभ्यास आणि इंग्रजी भाषेतील संवादकौशल्य (Communication Skill) यांवरचे अभ्यासक्रम तयार करून अशा विद्यार्थ्यांना भाषाविषयक आत्मविश्वास देणारे उपक्रम राबविले. त्याचबरोबर अशा विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन निर्वाहासाठी उपयुक्त ठरतील असे इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्क्रीन प्रिंटींग व कॉम्प्युटर ऑपरेशन अशा विषयांतील प्रशिक्षण देण्याचे उपक्रम कार्यवाहीत आणले. या विद्यार्थ्यांचे क्रीडानैपुण्य लक्षात घेऊन अनेक क्रीडाप्रकारांतील सुविधा उपलब्ध करून दिल्या.

विलेपार्ले येथील ज्या केळवणी मंडळाच्या मिठीबाई महाविद्यालयातून ते निवृत्त झाले, तेथेच त्यांनी मंडळाच्या सहकार्याने सी.बी. पटेल रीसर्च सेंटर ही पदव्युत्तर संशोधन संस्था स्थापन करून रसायनशास्त्रातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संशोधनाचे दार उघडून दिले. रासायनिक कंपनीच्या सहकार्याने स्वतंत्र प्रयोगशाळा उभारून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण केले. प्रस्तुत केंद्राचे स्वत:चे औषधांचे रासायनिक अभ्यास सुरू करून त्यासाठी सुमारे रु. ९०लाखांचा आर्थिक निधी उभा करून दिला. संशोधनाच्या दृष्टीने लक्षवेधी ज्ञाननिर्मिती/ज्ञानवितरण आवर्जून चालू ठेवले. त्यांच्या ७ वर्षांच्या कारकीर्दीत अनेक सेमिनार्समधून अभ्यासपूर्ण निबंध वाचले गेले. ज्यातील १८ निबंध आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांतून प्रकाशित झाले.

आणि याच केंद्रातून तोपर्यंत ५ विद्यार्थी-प्राध्यापकांनी पीएच.डी. पदवी संपादन केली.

मुंबईमधील शैक्षणिक कार्याखेरीज प्रा. केळकर यांची ऊर्जा, मुंबईपासून दूरच्या त्यांच्या कोकणभूमीतही निर्मितीचे विधायक कार्य करीत असते. संगमेश्वर तालुक्यातील धामणी येथली घर्डा फाऊण्डेशनचे विश्वस्त म्हणून त्यांनी ४ वर्षे ग्रामीण विकासाचे काम केले आहे. हे कामही मोठे सर्जनशील आणि लक्षवेधी आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील हे गाव दत्तक घेऊन या गावाच्या एकात्म विकासाच्या योजना कार्यवाहीत आणल्या. कृषिउत्पादन, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा या पंचसूत्रीवर भर देण्यात आला. गावाच्या उजव्या बाजूला वाहाणाऱ्या ओहळातून पाइपलाईन टाकून तीनचार वाड्यांना पिण्याचे पाणी आणून दिले. डाव्या बाजूला वाड्यांना विहिरी खणून पाणी पुरवठा सुरू केला. या दोन्ही बाजूंच्या पाणी पुरवठ्यासाठी आणि देखभालीसाठी, शिस्तबद्ध जाणिवेसाठी, पाणीपट्टीही सुरू केली. पिण्याच्या पाण्याची सोय, याचबरोबर वाल, तूर अशा उन्हाळी कडधान्य पिकाच्या योजनाही राबविल्या. याशिवाय गावकऱ्यांच्या साहाय्याने ४० स्वच्छतागृहे बांधली. लहान मुलांसाठी पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या बालवाड्या सुरू केल्या. शहरापासूनच्या या दूरच्या खेड्यात डॉक्टर नसल्याने तेथीलच अभ्यासू महिलांना वैद्यकीय प्रशिक्षण देऊन, वैद्यकीय सेवेसाठी 'बेअरफूट' डॉक्टर बनविले. या प्रशिक्षित महिला रोगाचे निदान करून प्राथमिक स्वरूपाची औषधेही देतात आणि गंभीर आजाराच्या रुग्णाला परिसरातील आरोग्य केंद्रावर नेऊन उपचार करवून घेत असतात.

याच प्रकारचे काम त्यांनी देखरूख येथील मातृमंदिरात ५ वर्षे कार्यकारी मंडळाचा सभासद या नात्याने केले आहे. पाणी पुरवठा, गांडूळ खत निर्मिती, वृक्षारोपण, रोपवाटिका, परित्यक्ता आधार, बालशिक्षण अशा योजना येथे राबविल्या जातात.

खूपच लक्षवेधी म्हणजे राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कार योजनेची कार्यवाही त्यांनी १४ वर्षे समर्थपणे सांभाळली आहे. ज्येष्ठ सामाजिक/राजकीय नेत्या मृणाल गोरे, त्यांचे केशव गोरे स्मारक ट्रस्टमधील, सहकारी आणि फाउंडेशनचे अमेरिकेतील अध्वर्यु सुनील देशमुख व त्यांचे सहकारी यांचे सहकार्य घेत उत्तम संयोजनाचा वस्तुपाठच सर्वांसमोर ठेवला. प्रतिवर्षी साहित्य आणि सामाजिक कार्य यांमध्ये विशेष कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती अशा दहा-बारा पुरस्कारांसाठीची निवड, निवड समित्यांचे आयोजन संबंधित पत्रव्यवहार, आर्थिक व्यवहार आणि शेवटचा दृष्ट लागण्यासारखा पुरस्कार वितरण समारंभ, या साऱ्या प्रशासकीय कामांची आखणी आणि कार्यवाही उत्तम रीतीने आणि सातत्याने चढत्या भाजणीने त्यांनी पार पाडली आहे. महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांना महाराष्ट्रात मिळालेली मान्यता व पुरस्कार सन्मानित व्यक्तींची झालेली निर्विवाद निवड, ह्या बाबी या कार्यक्षम कार्यवाहीच्याच द्योतक आहेत.

वरील प्रकारच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये काम करीत असताना जेथे प्रवाही, सर्जनशील, यथार्थ, उपयुक्त काम चालू आहे. तेथे त्यांनी सदस्य, कार्याध्यक्ष, विश्वस्त या नात्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या काम चालू ठेवले; आणि जेथे प्रवाही सर्जनशीलता संपली आहे, आणि जेथे वयाच्या ज्येष्ठतेनुसार मठाधिपतीचे मठ स्थापन होत आहेत असे दिसले, तेथे त्यांनी त्यांचा संबंध शांत बाणेदारपणे तोडून टाकला आहे. लोकशाही आधारित उपयुक्तता मूल्याबाबतचे त्यांचे ते कृतिशील निर्णयन असते.

वरील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्याबरोबरच आजच्या राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर - ज्यावर गंभीरपणे विचारमंथन व्हावे, ज्याची आर्थिक/राजकीय विश्वात कृतिशील दखल घेतली जावी असे आजच्या सार्वत्रिकच्या वर्तमानाला यथार्थ दिशा दाखवणारे, अर्थशास्त्रीय विश्लेषण करणारे लेखन त्यांनी केले आहे.

समोरील विद्यार्थ्यांना विचारप्रवण करीत अर्थशास्त्राचे अध्यापन करीत असतानाच पदवी/पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार त्यांनी ग्रंथलेखन केले आहेच. त्याचबरोबर वैचारिक पातळीवरचे त्यांचे स्वतंत्र विचारसरणीचे लेखन त्यांनी प्रामुख्याने 'समाज प्रबोधन पत्रिका', 'अर्थवाद' अशा वैचारिक नियतकालिकांतून केले आहे. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान, गालब्रेथ यांच्या 'इंडस्ट्रियल स्टेट' या ग्रंथावरील विचार, 'क्लब ऑव्ह रोम'चा पृथ्वीच्या नैसर्गिक साधनांच्या विनाशाविषयीचा 'मीडोज अँड मीडोज' यांचा (१९७०) अहवाल, परकीय भांडवल व जागतीकीकरण, श्रमवादी दृष्टिकोण, 'सेझ'चे आर्थिक विश्लेषण, अशा विषयांवरचे त्यांचे दिशादर्शक लेख वरील नियकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत.

याचबरोबर 'नाणेनिधी व जागतिक बँक यांचा नव-वसाहतवाद' (महाराष्ट्र राज्य पुरस्कार) आणि 'दुसरे जग शक्य आहे - पर्यायी लोकवादी व्यवस्था' हे त्यांचे, आजच्या वर्तमानाच्या अर्थशास्त्रीय आणि राजकीय क्षेत्रात पर्याय देणारे मौलिक ग्रंथ ठरत आहेत.

पहिल्या ग्रंथात अविकसित आणि अर्धविकसित देशांचे विकसित देशांकडून आंतरराष्ट्रीय संस्थांनी दिलेल्या कर्जाच्या माध्यमातून कसे शोषण होत आहे याची वस्तुनिष्ठ आणि

मर्मभेदक मांडणी केली आहे. या शोषणाला, अर्थशास्त्रीय आणि सर्व प्रकारच्या मानवी विनाशाला कोणता पर्याय देत येईल याचाही विचार त्या ग्रंथाच्या पर्याय या प्रकरणात मांडला आहे. आणि याच पर्याय प्रकरणाची सविस्तर मांडणी त्यांनी दुसऱ्या ग्रंथात केली आहे. 'श्रमवादी दुसऱ्या जगाची शक्यता असणारी लोकवादी व्यवस्था' असा हा पर्याय विचारमंथनाला आणि कृतिशीलतेला उपलब्ध झाला आहे.

प्रा. केळकर यांच्या दुसऱ्या पुस्तकातून त्यांच्या विचारांची खोली व सद्य:स्थितीला पर्याय शोधण्याची त्यांची तीव्र इच्छा वाचकांच्या लक्षात येईल.

प्रा. चंद्रकांत केळकर यांच्या मते भांडवली पद्धतीचे वित्त-भांडवली स्वरूप हे अखेरचे रूप आहे. कारण एका बाजूला, भांडवलाच्या या रूपामुळे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत वारंवार निर्माण होणारे अस्थैर्य (गेल्या तीन वर्षांतील मंदी हा या अस्थैर्याचाच भाग आहे.) व दुसऱ्या बाजूला, भांडवली पद्धतीतील निसर्गाच्या सततच्या दोहनामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक साधनांच्या उपलब्धतेच्या मर्यादा, यांमुळे मानव समाज विनाशाच्या काठावर येऊन ठेपला आहे.

भांडवलाने वर्चस्व निर्माण करण्याच्या काळात होत गेलेले बदलही प्रा. केळकर यांनी नोंदले आहेत. भांडवली पद्धती आकारास येण्यापूर्वी वस्तूंचे उत्पादन माणसाची 'जरुरी' भागविण्यासाठी होत होते; ते त्यानंतर त्याच्या भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेल्या 'गरजा' भागविण्यासाठी होऊ लागले. त्यामुळे उत्पादनामधील 'उपयुक्तता मूल्य' महत्त्वाचे न राहता 'विनिमय मूल्य' महत्त्वाचे झाले. तसेच निर्मितिक्षम मनुष्याचे श्रम विक्रेय करून, त्याची 'वस्तू' बनवून भांडवली पद्धतीने मनुष्याचे निर्मानुषीकरण केले व या सर्व बदलांतून मनुष्य परात्म झाला.

प्रा. केळकर यांच्या या पुस्तकाचा तीन चतुर्थांश भाग 'पर्यायी लोकवादी व्यवस्थे'च्या मांडणीकरता योजलेला आहे. त्यांच्या मते आजच्या परिस्थितीत पर्यायाची विचार करण्याची निकड तीव्र झाली आहे. त्यांनी मांडलेल्या पर्यायात भांडवलाचे स्वरूप बदलण्याचा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामध्ये भांडवली पद्धतीला पायाभूत असलेली श्रेणीबद्ध रचना बदलून त्या जागी समांतर, श्रेणीविरहित व्यवस्था आणणे, 'गरजा' पूर्ण करण्याच्या उद्दिष्टाऐवजी 'जरुरी'ची पूर्तता, हे उत्पादनाचे उद्दिष्ट बनविणे; उत्पादन कशासाठी व कसे करावे, हे ठरविण्याचे, त्याविषयीचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य उत्पादकाला मिळणे, श्रमिकाला परात्म करणाऱ्या श्रमविभागाऐवजी श्रमिकाच्या सर्जनशीलतेच्या भेदावर श्रमविभाग आधारणे, व अखेरीला भांडवलाचे सामाजीकरण करून त्याच्या गुंतवणुकीचे नियोजन करणे - असे बदल भांडवल या कोटीमध्ये करण्याचा आग्रह प्रा. केळकर यांनी धरला आहे. औद्योगिक क्षेत्र डोळ्यापुढे ठेवून हे बदल अंतर्भूत करणारा, उत्पादनाच्या निर्णय प्रक्रियेत उत्पादकांचा पूर्ण सहभाग असणारा असा; उद्योग संस्था व राष्ट्र या दोन्ही पातळ्यांवर कार्यान्वित करता येईल, असा व्यवस्थापनेचा आराखडा मांडला आहे.

त्याचप्रमाणे पर्यायी व्यवस्थेत पैसा व बाजार यांचे स्वरूप कसे असेल हे मांडताना प्रा. केळकर म्हणतात, ''विनिमय पैसा, बाजार, श्रमविभाग, उत्पादनाचे आकारमान या सर्व कोटी न्याय्य समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्या प्रत्येक कोटीमध्ये होणारे बदल परस्परावलंबी आहेत. विनिमयाचे प्रमाण (Scale) ज्या वेळी विस्तारते त्या वेळी पैशाचे कार्य केवळ माध्यमाच्या पुरते मर्यादित न राहता ते त्याही पलिकडे जाते; म्हणजे पैसा मूल्य संचयाचे साधन म्हणून अधिकाधिक प्रमाणात आवश्यक होऊ लागतो. अशा विस्तारित बाजाराकरता करावयाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करावे लागल्याने त्याचे, उत्पादन प्रमाणावर व उत्पादन तंत्रावर होणारे परिणाम व्यवस्था अधिकाधिक अन्यायकारक करीत जातात. बाजार व पैसा या कोटींचा विचार करताना उत्पादक, उत्पादन व उपभोक्ता यांमधील संबंध जवळचे असणे; व पर्यायी व्यवस्थेत केवळ व्यवहारांतील माध्यम म्हणून पैसा आपले कार्य करील; त्याला संचयाचे कार्य करण्याची गरज राहणार

**शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये काम करीत असताना जेथे प्रवाही, सर्जनशील, यथार्थ, उपयुक्त काम चालू आहे.**
**तेथे त्यांनी सदस्य, कार्याध्यक्ष, विश्वस्त या नात्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या काम चालू ठेवले; आणि जेथे प्रवाही सर्जनशीलता संपली आहे, आणि जेथे वयाच्या ज्येष्ठतेनुसार मठाधिपतीचे मठ स्थापन होत आहेत असे दिसले, तेथे त्यांनी त्यांचा संबंध शांत बाणेदारपणे तोडून टाकला आहे. लोकशाही आधारित उपयुक्तता मूल्याबाबतचे त्यांचे ते कृतिशील निर्णयन असते.**

नाही, अशी बाजार व पैसा यांची व्यवच्छेदक लक्षणे असतील, अशी मांडणी ते या बाबतीत करतात.

पर्यायी व्यवस्थेतील पर्यावरणाचा विचार करताना पर्यावरणाचा नाश व त्यावरील उपाय यांचा आढावा घेऊन मार्क्सने अधोरेखित केलेल्या मजुराच्या वरकड मूल्यासारखाच निसर्गाच्या होणाऱ्या दोहनामुळे निर्माण होणाऱ्या वरकड मूल्याचाही उल्लेख ते करतात. निसर्गाची होणारी झीज हा एक परिव्यय आहे, असे अर्थशास्त्राने मानावे, असा आग्रह धरतात; व पर्यायी व्यवस्थेत पर्जन्य चक्र, जीवनसत्त्व चक्र चालू होण्यासाठी पावले उचलावी लागतील, अशी प्रा. केळकरांची भूमिका आहे.

प्रा. केळकर यांनी त्यांची मांडणी युटोपियन वाटू नये, यासाठी करुणाकरन यांचा तामिळनाडूतील प्रयोग, व इंग्लंड, स्पेन, ब्राझील व अर्जेंटिना या देशांची उदाहरणे घेऊन त्यांच्या विचारांमधील व्यवहार्यता दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांच्या पुस्तकात मांडलेला पर्याय प्रत्यक्षात आणण्याकरता जे परिवर्तनवादी लढे द्यावे लागतील त्यांची प्रात्यक्षिकेही त्यांच्या मते दक्षिण अमेरिकेतील अनेक देशांत अलीकडेच घडून आलेल्या 'गुलाबी' क्रांतीत पाहायला मिळतात, अशी त्यांची भूमिका आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या संपूर्ण मांडणीसाठी पर्यायी लोकवादी व्यवस्थेसाठीची पार्श्वभूमी, कारणमीमांसा यांसाठी कार्ल मार्क्सपासून महात्मा गांधी, इस्तवान मेझारॉस, जे.बी.फॉस्टर, फ्रेंड मॅगडॉफ, जेम्स पेत्रास, लेसली मॅकॉल, ए.डी. परसौद, अर्जुन जयदेव, अर्नेस्ट मंडेल, पॉल स्वीझी, डेन वॉर्ड, डेव्हिड स्लोकार्ट, जसलॉक वावेक, रजनी बक्षी, लेस्टर ब्राऊन, सरल सरकार, गोविंदराव देशपांडे, क्रेफोर्ड मोर्स, थॉमस बर्गर, विनय रमा रघुनाथ, टी.ओ.बल्हे, विजय प्रसाद खुजाथा फर्नांडिस, नंदलाल मास्टर, नेव्हिल डिसोझा, उलिसा सेन अशा अनेक विचारवंतांच्या, अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचे परिशीलन केले आहे.

असे हे गाढ व्यासंगी प्राध्यापक चंद्रकांत केळकर रचनात्मक कार्य आणि परिवर्तनवादी मूलभूत वैचारिक लेखन करीत, मित्र परिवारामध्ये साहित्य, संगीत, चित्रपट, चित्रकला, समाजकारण, राजकारण आदी चर्चा-गप्पांमध्ये मोठ्या रसिकतेने सामील होत असतात.

**प्रा. मधू पाटील**
चौथा मजला, जीवनसागर तरंग,
एलआयसी कॉलनी,
बोरिवली (पूर्व), मुंबई.
Ph. 022-28933924